# यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजन क्षमता : भौगोलिक अध्ययन

**प्रा. डॉ. निलिमा देवरावजी अंबाडकर**
सहाय्यक प्राध्यापक
पि. आर. पाटील शिक्षण महाविद्यालय, अमरावती
मोबाईल क्र – ७६६६४७८९६३, इमेल – nilimaambadkar143@gmail.com

**प्रा. डॉ. मनोज बि. गाथे**
भूगोल विभाग प्रमुख
बॅरिस्टर रामराव देशमुख कला, श्रीमती इंदिराजी कापडिया
वाणिज्य व न्यायमूर्ती देशमुख विज्ञान महाविद्यालय, अमरावती
मोबाईल क्र – ९८२२४६४७८५ , इमेल – manojgathe15@gmail.com

**सारांश**

भारत हा कृषी प्रधान देश आहे तसेच देशातील मुख्य अर्थव्यवस्था ही कृषीवरच अवलंबून आहे. कृषी विकासात भूमी उपयोजनाचे अनन्य साधारण महत्व आहे. भूमी उपयोजन जर विकसित असेल तर कृषीचा विकासही झालेला आढळून येतो. यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील एक जिल्हा असून हा जिल्हा कापूस उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. या जिल्ह्यातील सुमारे ६०% पेक्षा अधिक लोकसंख्या हि कृषीवर आधारित आहे. त्यामुळे भूमी उपयोजनाचे शेतीच्या विकासात महत्व असून त्याचा प्रभाव देखील आढळून येतो.प्रस्तुत संशोधन निबंधात यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजन क्षमत आणि त्यातील बदलाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

***बीजसंज्ञा* -** कृषी भूमी उपयोजन क्षमता, कृषी विकास, बदल, वाढ, घट

## प्रस्तावना

कृषी भूमी उपयोजन क्षमता म्हणजे एकूण लागवडीखालील क्षेत्र व निव्वळ कसलेले क्षेत्र याचे गुणोत्तर आहे. हे गुणोत्तर ह्या प्रदेशात अधिक असते तेथील भूमी उपयोजन क्षमता अधिक असते तर गुणोत्तर कमी होत गेल्यास भूमी उपयोजन क्षमता घटताना आढळते. प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्ह्यातील १९८१ ते २०११ याकाळातील कृषी भूमी उपयोजन क्षमतेचा व त्यातील बदलाचे अध्ययन तालुकानिहाय करण्यात आलेले आहे.

## उद्दिष्ट्ये

१) यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजनाचे तालुकानिहाय अध्ययन करणे
२) यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजनातील बदलाचे तालुकानिहाय अध्ययन करणे.

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती

प्रस्तुत संशोधन लेख हा द्वितीय स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारावर आहे. आवश्यक माहिती आणि आकडेवारीचे संकलन सामाजिक-आर्थिक समालोचन, जिल्हा कृषी कार्यालय, यवतमाळ, मधून करण्यात आलेले आहे. कृषी भूमी उपयोजन क्षमता ही जसबीर सिंग (१९७२) यांनी सुचविलेल्या पुढील सूत्रानुसार काढण्यात आलेली आहे.

**भूमी उपयोजन क्षमता = (एकूण पिक क्षेत्र ÷ निव्वळ कसलेले क्षेत्र) x १००**

**बदल = चालु काळातील मूल्य – मागील काळातील मूल्य**

**अभ्यास प्रदेश**

यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशात दक्षिणेकडे स्थित आहे. या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९° २६' उत्तर ते २०° ४२' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७७° १८' पूर्व ते ७९° ९' पूर्व रेखांश दरम्यान आहे. जिल्ह्यात सध्यस्थितीत एकूण १६ तालुके असून जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १३५८४ चौकिमी आहे. तर २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २७७७२३४८ एवढी आहे. जिल्ह्याच्या उत्तरेला वर्धा व अमरावती जिल्हे असून, पश्चिमेला वाशीम व हिंगोली जिल्हे आहेत. तर नांदेड जिल्हा व तेलंगाना राज्य दक्षिणेकडे असून पूर्वेकडे चंद्रपूर जिल्हा आहे.

**कृषी भूमी उपयोजन क्षमता**

सारणी क्रमांक १ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील १९८१ ते २०११ याकाळातील कृषी भूमी उपयोजन क्षमता तालुकानिहाय दर्शविली आहे. ज्या तालुक्यातील भूमी उपयोजन क्षमता निर्देशांक १०० पेक्षा कमी तिथे उपयोजन क्षमता कमी, १०० ते ११० दरम्यान मध्यम तर निर्देशांक ११० पेक्षा अधिक म्हणजे उपयोजन क्षमता अधिक अशा प्रकारे विभाजन करून विश्लेषण करण्यात आलेले आहे. अभ्यास प्रदेशातील एकूण कृषी भूमी उपयोजन क्षमता निर्देशांक १९८१ मध्ये १०२.९ असून १९९१ मध्ये तो ६७.०९ आढळून येतो. १९९१ मध्ये त्यात घट झालेली आढळून येते. वर्ष २००१ मध्ये तो ५४.३६ असून त्यात परत घट झालेली आढळून येते तर २०११ मध्ये १००.६२ असून १९९१ व २००१ च्या तुलनेत त्यात वाढ दिसून येते. यवतमाळ जिल्ह्यात १९८१ व १९९१ मध्ये एकूण १४ तालुके होते त्यानंतर २००१ व २०११ नुसार एकूण १६ तालुके आहेत. आर्णी आणि झारीझामाणी या दोन नवीन तालुक्याची निर्मिती २००१ मध्ये झालेली दिसून येते.

**सारणी क्रमांक १**


**यवतमाळ जिल्हा – कृषी भूमी उपयोजन क्षमता (१९८१ ते २०११)**

| तालुके | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|
| नेर | १०१८. | ९९५७. | ९८४. | १३३ |
| बाभूळगाव | १०६१८. | ९९७८. | ९६४. | ८८५. |
| कळंब | १०६९५. | १०१४. | ९३९. | ११२ |
| यवतमाळ | १०१६३. | ९८८६. | ९४५. | ९२७. |
| दारव्हा | १०१६५. | ११२६. | ९७८. | १०५ |
| दिग्रस | १०५७३. | १०० | ९६८. | ९७ |
| पुसद | ९९५६. | ९७३१. | १०९ | १०५४. |
| उमरखेड | १०७८२. | ११०५. | ६६९. | ९३७२. |
| महागाव | ९८५. | १०९८. | ९९६. | १०११. |
| आर्णी | | | ४९९२. | ९३५. |
| घाटंजी | १०४५१. | १०७७१. | १२३२५. | ९३७८. |
| केळापूर | १०२९२. | ५६४. | १०११३. | १०४३. |
| राळेगाव | १०४९७. | १२६८६. | ९४७२. | ९२५५. |
| मारेगाव | ९६१६. | ९८८४. | ९६४७. | १०२१. |
| झारीझामणी | | | ९६६८. | ९६७९. |
| वणी | १०५५६. | ९८५५. | ८९२९. | १०४८. |
| एकूण | १०२९. | ६७०९. | ५४३६. | १००६२. |

स्त्रोत – संशोधक

**कमी कृषी भूमी उपयोजन क्षमता प्रदेश**

१९८१ मध्ये मारेगाव, महागाव व पुसद या तीन तालुक्यांचा भूमी उपयोजन कार्यक्षमता निर्देशांक सर्वात कमी आढळून येतो. तर १९९१ मध्ये कमी भूमी उपयोजन कार्यक्षमता असणाऱ्या तालुक्यांमध्ये वाढ झालेली आढळून येते. १९९१ मध्ये नेर, केळापूर, पुसद, वणी, मारेगाव, यवतमाळ व बाभूळगाव या तालुक्यांमध्ये क्रमशा हा निर्देशांक कमी आढळून येतो. २००१ मध्ये जिल्ह्यातील ८०% पेक्षा अधिक क्षेत्रात उपयोजन क्षमता हि कमी झालेली आढळून येते. याकाळात १३ तालुक्यांमध्ये हा निर्देशांक १०० पेक्षाही कमी असल्याचे दिसून येते (सारणी क्रमांक १). आर्णी, उमरखेड, वणी, कळंब, यवतमाळ, राळेगाव, बाभूळगाव, झरीझामणी, दिग्रस, दारव्हा, नेर आणि महागाव तालुक्यात कृषी म्भूमी उपयोजन क्षमता कमी असल्यचे आढळते. २०११ याकाळात बाभूळगाव, राळेगाव, यवतमाळ, आर्णी, उमरखेड, घाटंजी, झारीझामणी व दिग्रस तालुक्यात क्रमशा हा निर्देशांक कमी असल्याचे आढळते.



**मध्यम कृषी भूमी उपयोजन क्षमता प्रदेश**

यवतमाळ जिल्ह्यात १९८१ मध्ये नेर, यवतमाळ, दारव्हा, केळापूर, घाटंजी, राळेगाव, वणी, दिग्रस, बाभूळगाव, कळंब आणि उमरखेड तालुक्यात भूमी उपयोजन क्षमता मध्यम असल्याचे आढळते. तर १९९१ मध्ये दिग्रस, कळंब, घाटंजी आणि महागाव तालुक्यात मध्यम असलेले दिसून येते. जिल्ह्यात २००१ मध्ये केवळ केळापूर आणि पुसद तालुक्यात भूमी उपयोजन क्षमता मध्यम असून २०११ मध्ये महागाव, मारेगाव, केळापूर, वणी, दारव्हा व पुसद तालुक्यात मध्यम असल्यचे दिसते. पुसद तालुक्यात २००१ व २०११ याकाळात हा निर्देशांक मध्यम गटात सर्वात अधिक असल्याचे आढळते.

**उच्च कृषी भूमी उपयोजन क्षमता प्रदेश**

यवतमाळ जिल्ह्यात १९८१ या वर्षी कुठल्याच तालुक्यात कृषी भूमी उपयोजन निर्देशांक ११० पेक्षा आधिक आढळून येत नाही त्यामुळे याकाळात जिल्ह्यात निर्देशांक निम्न व मध्यमच आढळून येतो. अभ्यास प्रदेशात १९९१ मध्ये उमरखेड, दारव्हा आणि राळेगाव तालुक्यात भूमी उपयोजन क्षमता ही अधिक असल्याचे आढळून येते. तर २००१ मध्ये केवळ घाटंजी तालुक्यात ही क्षमता अधिक असल्याचे निदर्शनास येते. २०११ मध्ये नेर व कळंब या दोन तालुक्यात हा निर्देशांक उच्च असल्याचे आढळून येते. अभ्यास प्रदेशात १९९१, २००१ व २०११ या तिन्ही काळात वेगवेगळया तालुक्याम्ध्ये भूमी उपयोजन क्षमता उच्च आढळते त्यात एकसारखेपणा आढळून येत नाही. जे तालुके १९९१ मध्ये उच्च होते ते २००१ व २०११ मध्ये दिसून येत नाही. नकाशा क्रमांक १ ते ४ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील भूमी उपयोजन कार्यक्षमता १९८१ ते २०११ दरम्यान तालुकानिहाय दर्शविली आहे.

**कृषी भूमी उपयोजन क्षमतेतील बदल**

सारणी क्रमांक २ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजनेतील बदल १९८१ ते १९९१, १९९१ ते २००१ व २००१ ते २०११ याकाळातील दर्शविण्यात आलेला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील एकूण भूमी उपयोजन क्षमतेत १९८१ ते १९९१ आणि १९९१ ते २००१ याकाळात घट झालेली दिसून येते. ह्या निर्देशांकाचे मुल्य १९८१ ते १९९१ याकाळात ३५.८ ने कमी झाले असून १९९१ ते २००१ याकाळात १२.७३ ने कमी झालेले दिसून येते. २००१ ते २०११ याकाळात मात्र यात ४६.२६ नी वाढ झालेली आढळते.

**सारणी क्रमांक २**

**यवतमाळ जिल्हा – कृषी भूमी उपयोजन क्षमतेतील बदल (१९८१ ते २०११)**

| तालुके | १९८१ ते १९९१ | १९९१ ते २००१ | २००१ ते २०११ |
|---|---|---|---|
| नेर | -२२३. | -११७. | ३४६. |
| बाभूळगाव | -६४. | -३३८. | -७९. |
| कळंब | -५५५. | -७५. | १८१. |
| यवतमाळ | -२७७. | -४३६. | -१८. |
| दारव्हा | १०९५. | -१४८. | ७२. |
| दिग्रस | -५७३. | -३ | ०२. |
| पुसद | -२२५. | ११६९. | -४ |
| उमरखेड | २६८. | -४३६. | २६८. |
| महागाव | ११३. | -१०२. | १५. |
| आर्णी | - | - | ४३५८. |
| घाटंजी | ३२. | १५५४. | -२९४७. |
| केळापूर | -४६५२. | ४४७३. | ३१७. |

| तालुके | १९८१ ते १९९१ | १९९१ ते २००१ | २००१ ते २०११ |
|---|---|---|---|
| राळेगाव | २१८९. | -३२१४. | -२१७. |
| मारेगाव | २६८. | -२३७. | ५६३. |
| झारीझामणी | - | - | ०११. |
| वणी | -७०१. | -९२६. | १५५१. |
| **एकूण** | **-३५८.** | **-१२७३.** | ४६२६. |

स्त्रोत – संशोधक

**१९८१ ते १९९१ मधील बदल**

याकाळात उमरखेड, मारेगाव, घाटंजी, दारव्हा, महागाव आणि राळेगाव या तालुक्यात भूमी उपयोजन क्षमतेत वाढ झालेली दिसते तर इतर सर्व तालुक्यात त्यात घट झालेली आहे, म्हणजेच ऋणात्मक बदल झाले आहेत. राळेगाव मधील धनात्मक बदल (२१.८९) सर्वाधिक आढळून येतो. तर सर्वाधिक घट ही केळापूर (-४६.५२) तालुक्यात आढळून येते.


**१९९१ ते २००१ मधील बदल**

याकाळात पुसद, घाटंजी आणि केळापूर या तालुक्यात धनात्मक बदल झालेले आढळून येते. या तालुक्यातील निर्देशांक १० पेक्षा अधिक ने वाढलेला आहे. केळापूर तालुक्यातील बदल हा सर्वाधिक (४४.७३) दिसून येतो. इतर सर्व तालुक्यांमध्ये उपयोजन क्षमता कमी झालेली असून उमरखेड (-४३.६) तालुक्यात ही घट सर्वाधिक आढळून येते.

**२००१ ते २०११ मधील बदल**

जिल्ह्यात २००१ ते २०११ दरम्यान एकूण ९ तालुक्यामध्ये भूमी उपयोजन कार्यक्षमता निर्देशांक वाढलेला आढळतो. महागाव, केळापूर, मारेगाव व दारव्हा मध्ये निर्देशांकातील वाढ १ते ८ असून वणी, कळंब व उमरखेड मधील वाढ १५ ते ३० दरम्यान आढळते. नेर (३४.६) व आर्णी (४३.५८) मधील वाढ जिल्ह्यात सर्वाधिक आहे. उर्वरित तालुक्यात यात घट झालेली असून घाटंजी (-२९.४७) तालुक्यातील घट सर्वात हस्त असलेली आढळते. आलेख क्रमांक १ मध्ये १९८१ ते २०११ दरम्यान कृषी भूमी उपयोजानातील बदल तालुकानिहाय दर्शविले आहे.

यवतमाळ जिल्हा
कृषी भूमी उपयोजन क्षमतेतील बदल (१९८१ ते २०११)




आलेख क्रमांक १

**निष्कर्ष व उपाययोजना**

यवतमाळ जिल्ह्यातील कृषी भूमी उपायोजन कार्यक्षमतेत १९८१ ते २०११ याकाळात एकसारखेपणा नसून त्यात सारखे बदल होत असलेले आढळून येतात. ज्या तालुक्यात आधी क्षमता अधिक होती त्या तालुक्यात कालांतराने भूमी उपयोजन क्षमता कमी झालेली दिसून येते.

पर्जन्यातील अनिश्चितता, जलसिंचन सुविधांचा विकास, जमिनीचा आकार इत्यादी घटकांचा भूमी उपयोजन क्षमतेवर प्रामुख्याने प्रभाव अभ्यास प्रदेशात होत असल्याचा आढळून येतो.

अभ्यास प्रदेशात भूमी उपयोजनेमध्ये पडीत जमिनीचे क्षेत्र हे कमी झालेले आहे. जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी हे क्षेत्र क्रमाक्रमाने ठेवणे आवश्यक असते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात हे क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. तसेच कमी पर्जन्याची पिके, आधुनिक तंत्राचा वापर करून शेती पद्धती, ठिबक सिंचन, योग्य बियाणे व योग्य खतांचा वापर इत्यादी घटकांचा अवलंब केला तर भूमी उपयोजन कार्यक्षमता वाढून कृषीचा विकास होण्यास मदत होईल.

वर्तमान आणि भविष्यातील लोकसंख्येची गरज पूर्ण करण्यासाठी विद्यमान भूमी उपयोजन पद्धतीत सुधारणा आवश्यक आहे त्याचा प्रभाव कार्यक्षमतेवर व अर्थव्यवस्थेवर सकारत्मक होईल.

**संदर्भ सूची**


1) अंबाडकर निलिमा देवरावजी (२०२०), “यवतमाळ जिल्ह्यातील कृषी विकासाच्या स्तराचे अभिक्षेत्रीय विश्लेषण”, अप्रकाशित शोध प्रबंध, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, पृ क्र ८१-८७.
2) Singh Jasbir (1975), “An Agricultural Atlas of India”. A geographical Analysis Vishal Publication Kurukshetra, India p-139.
3) Singh, Jasbir (1972), “A New Technique for Measuring Agricultural Productivity in Haryana (India)” The Geographer, Vol No - 19, pp 15-33.
4) Vaidya B. C. (1997), “Agricultural land use in India (A Study of Basin)", MP&sfc Publications, New Delhi.